**प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत डेटा बेस डिजीटायझेशन करण्याकरिता आयोजित बैठकीचे इतिवृत्त**

**दिनांक :-** ११/४/२०१९ **स्थळ :-** आयुक्त कक्ष (छोटे सभागृह)

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र लाभार्थी शेतकरी कुटुंबाची माहिती पी. एम. किसान पोर्टलवर अपलोड करण्यात आलेली असून संबंधितांचे बँक खात्यावर पहिल्या हप्त्याची रक्कम रू. २०००/- जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर लाभार्थ्यांचा उपलब्ध डेटा बेस चे डिजीटायझेशन करण्यासाठी करावयाच्या कार्यवाही बाबत दि. ११/०४/२०१९ रोजी दुपारी ४.०० वा. मा. आयुक्त कृषि यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. जयंत टेकाळे, | उप आयुक्त कृषि गणना तथा पथक प्रमुख पी.एम.किसान योजना |
| २ | श्री. डी.व्ही. कुलथे | कृषि उपसंचालक (संगणक प्रकल्प) |
| ३ | श्री. ए.ए.गावडे | सहाय्यक संचालक , लेखा - १ |
| ४ | श्री. धनंजय कुलकर्णी | जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे. |
| ५ | श्री. पी.एम. शिंदे | तंत्र अधिकारी, आयुक्त कृषि कक्ष |
| ६ | श्री. एच. जे. शिंदे | तंत्र अधिकारी, उपायुक्त कृषि गणना |
| ७ | श्री. एम.पी. वैद्य | तंत्र अधिकारी, (संगणक प्रकल्प) |
| ८ | श्री. श्रेणिक शहा | माहिती तंत्रज्ञान, सल्लागार |
| ९ | श्री. एस.डी.कुलकर्णी | कृषि अधिकारी, उपायुक्त कृषि गणना |
| १० | श्री. महावीर कानगुडे | तंत्र सहाय्यक, उपायुक्त कृषि गणना |

उपआयुक्त कृषि गणना यांनी उपस्थितांचे स्वागत केले व विषयांकित बैठकीची पार्श्वभूमी विशद केली. केंद्र शासनाकडील दि. २० मार्च २०१९ च्या पत्रानुसार पी.एम. किसान योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांनी सादर केलेले अभिलेख व्यवस्थितपणे डिजीटाईज करून जतन करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच मा. सचिव कृषि मंत्रालय मुंबई यांचे दि. ०१ एप्रिल २०१९ पत्रानुसार आयुक्त कृषि यांनी कागदपत्रांचे डिजीटायझेशन करण्याची कार्यपध्दती तयार करून सर्व जिल्हाधिका-यांना उपलब्ध करून देऊन त्यानुसार तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात असे सूचित केले आहे. अशी सभेत माहिती दिली.

याबाबत सभेतील उपस्थित पथक सदस्यांची सविस्तर चर्चा झाली. श्री. धनंजय कुलकर्णी, जिल्हा माहिती अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासनामार्फत अपेक्षित कार्यवाहीबाबत एनआयसी, नवी दिल्ली यांचेशी संपर्क साधला असता लाभार्थ्यांना द्यावयाच्या तिस-या हप्त्याकरिता लाभार्थ्यांची माहिती आधार क्रमांकास लिंक करणार आहेत, अशी माहिती प्राप्त झाली. त्यामुळे सदर डिजिटायझेशनचे काम या स्तरावरच करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे अभिलेखांचे डिजीटायझेशन करणे कामी सर्व अभिलेखे स्कॅन करणे, स्कॅन केलेली अभिलेखे डेटा बेस मॅनेजमेंट सॉफ्टवेअर मध्ये अपलोड करणे, अपलोड केलेला डेटा क्लाऊड वर / सर्व्हर वर / डेटा सेंटर मध्ये होस्ट करणे. या करिता आऊट सोर्सिंगद्वारे माहितगार खाजगी संस्थेची नियुक्ती केल्यास सदर काम

सुव्यवस्थित व वेळेत पुर्ण होऊ शकेल असे श्री वैद्य, तंत्र अधिकारी संगणक प्रकल्प यांनी सुचविले. तथापि लोकसभा निवडणुक आचार संहितेमुळे सद्यस्थितीत संस्था नियुक्ती साठी ई निविदेची कार्यपध्दती राबविणे शक्य होणार नाही. असे श्री. गावडे, सहाय्यक संचालक लेखा १ यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणले.

तरी योजने अंतर्गत पात्र लाभार्थी शेतकरी कुटूंबांचे अभिलेख डिजीटाईज करण्यासाठी अवलंब करावयाच्या कार्यपध्दतीबाबत महा आयटी मंत्रालय मुंबई यांचे मार्गदर्शन घेऊन प्रकल्प शाखेने सविस्तर प्रस्ताव सादर करावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर ही कार्यपध्दती सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात येईल.

तंत्र अधिकारी (कृषि गणना) यांनी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

**उप आयुक्त (कृषि गणना)**
**कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य,**
**पुणे ५**

**प्रत :-** मा. उप सचिव (११ ए ),कृषि व पदूम विभाग, मंत्रालय, मुबई-३२.

---

जा.क्र/कृआ/पी.एम.किसान/इतिवृत्त/२४०/२०१९
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
दिनांक- १६/०४/२०१९